# निर्धार

# वार्षिकांक

## सत्र २०१९-२०२०

बॅकवर्ड क्लास युथ रिलिफ कमिटी नागपूर द्वारा संचालित

## भिवापूर महाविद्यालय, भिवापूर

**Accredited with Grade `B' (CGPA-2-54) by NAAC, Bengaluru**



# Our Inspiration



**Hon.**
**Late Shri Bhausaheb Mulak**
Ex. Minister, Maharashtra State
Ex. Mayor-NMC, Founder Chairman
Backward Class Youth Relief Committee &
Bhausaheb Mulak Charitable Trust, Nagpur



**Hon.**
**Smt. Sumanmala B. Mulak**
Chairperson,
Backward Class Youth Relief Committee &
Bhausaheb Mulak Charitable Trust, Nagpur

## Founder's Message

This is an age of Modem Science and Technology where Artificial Intelligence rules and much more to do with Digital Data and Technological Sciences. With these in the forefront of our growth, we are bound to join the bandwagon of Developed Nations with the Human Resources we are blessed with. We do believe in the worth of our previous generations who have instilled in us the virtue of honesty, truthfulness and service to the society. We, at our Institution, aim at the holistic development of an individual by providing quality education, technical know-how, personality traits and leadership qualities to be ready for life.

# The Leader



**Hon.**
**Shri Rajendra B. Mulak**
Ex. Minister of State, (Govt. of Maharashtra)
Finance & Planning, Energy, Water Resources,
Parliamentary Affairs & Excise
Hon. Secretary, B.C.Y.R.C and B.M.C.T



**Hon.**
**Smt. Prerna B. Mulak**
Managing Director,
B.C.Y.R.C. & B.M.C.T.,
Nagpur

## An introduction to BCYRC

Backward Class Youth Relief Committee was founded in 1974 with the primary objective of the holistic development of students belonging to Backward Class in Rural Areas. Founded by Late Shri. Bhausaheb Mulak, Former Minister, Government of Maharashtra, Ex-Mayor of Nagpur Municipal Corporation. He was a phenomenon with noble convictions. This Organization has grown by leaps and bounds. Shri Rajendra Mulak, Former Minister of State (Government of Maharashtra) and the Secretary of B.C.Y.R.C, is an enterprising, dynamic and innovative personality. He is the catalytic force behind the progress of our Organization and is a youth Icon to reckon with.



**Hon. Yashraj R. Mulak**
Treasurer, B.C.Y.R.C and B.M.C.T
Nagpur



**Shri Padmakar Agrawal**
Member of
College Development Committee
Bhiwapur Mahavidyalaya, Bhiwapur



**Dr. Jobi George**
Principal
Bhiwapur Mahavidyalaya
Bhiwapur

# महाविद्यालयाविषयी थोडेसे..........

आमच्या सर्व संस्थेचे संस्थापक, प्रवर्तक व आधारस्तंभ शिक्षणमहर्षी माननीय स्व. श्री. भाऊसाहेब मुळक आहेत. मा. भाऊसाहेबांनी ग्रामीण भागातील जनेचे आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक शैक्षणिक व राजकीय जीवन जवळून तर बघितलेच पण त्या जीवनाचा त्यांनी स्वत: अनुभव घेतला. त्यांचे व्यक्तिमत्व म्हणजे ग्रामीण व नागरी जीवनाचे एक सुसंगत एकजिनसी आणि रसाळ मिश्रण होय. मा. भाऊसाहेबांनी मागासवर्गीय व आर्थिकदृष्टया दुर्बल विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक व सर्वांगीण उत्थानाकरिता सन १९७४ मध्ये 'बॅकवर्ड क्लॉस युथ रिलीफ कमेटी' ह्या संस्थेची नागपूर येथे स्थापना केली. महाराष्ट्राचे दिवंगत नेते व मुख्यमंत्री श्री. मा.सा. उर्फ दादासाहेब कन्नमवार हे गरीब घराण्यात जन्मलेले पण राजकारणात उत्तुंग शिखर गाठलेले वैदर्भीय नेते हे मा. भाऊसाहेबांचे प्रेरणास्थान व राजकीय गुरु होते.

माननीय स्व. श्री. भाऊसाहेब मुळक यांनी स्वत:ला शैक्षणिक चळवळीसाठी वाहून घेतले आहे. व्यावसायिक शिक्षणाची गरज लक्षात घेऊन कर्मवीर दादासाहेब कन्नमवार अभियांत्रिकी महाविद्यालय, १९८३ साली नागपूर पॉनीटेक्निक व १९८९ मध्ये आयुर्वेद महाविद्यालय ह्या संस्थांची नागपूर येथे स्थापन केली. हया नामवंत संस्थेत तांत्रिक व वैद्यकीय महाविद्यालयीन उच्च शिक्षणाचा लाभ विदर्भातीलच नव्हे तर पूर्ण देशातील विद्यार्थी घेत आहेत. त्यांनी कोटयावधी रुपये खर्च करुन ह्या संस्थांच्या भव्य, वास्तू, प्रांगणे, मुलामुलींची वसतीगृहे, ग्रंथालये, क्रीडांगणे, व अद्यावत उपकरणांनी सज्ज प्रयोगशाळा उभारलेल्या आहेत. ही सर्व महाविद्यालये उच्च शिक्षाविभुषीत प्राध्यापकांनी युक्त आहेत. संस्थेच्या आयुवैद महाविद्यालयात रुग्णांकरिता आंतरविभाग व बाह्य विभाग असून गरीब मागासवर्गीय जनता हया दवाखान्यात विनामूल्य लाभ घेत आहेत.

वरील महाविद्यालयीन संस्थांचे कार्य लक्षात घेऊन बॅकवर्ड क्लास युथ रिलिफ कमिटी, नागपूर हया शैक्षणिक संस्थेला महाराष्ट्र शासनाने ग्रामीण भागात उच्च शिक्षणाचा प्रसार व प्रचार करण्याकरिता प्रात्साहित केलेले आहे. आपल्या उमरेड ह्या जुन्या निर्वाचन क्षेत्रातील जनतेचे ऋण फेडण्याच्या दृष्टीने व विशेषत: ह्या विभागातील मान्यवरांच्या विनंतीनुसार संस्थेचे संस्थापक अध्यक्ष माननीय भाऊसाहेब मुळक यांनी भिवापूर ह्या ग्रामीण भागात सन १९९० साली भिवापूर महाविद्यालय भिवापूर स्थापन केले. भिवापूर, क्षेत्रातील कमकुवत मागासवर्गीय व होतकरु विद्यार्थी कला, वाणिज्य व विज्ञान शाखांमध्ये महाविद्यालयीन उच्च शिक्षणाचा लाभ घेत आहेत. विद्यार्थ्यांना सर्व शैक्षणिक सवलती उपलब्ध असून विशेषत: पूर्ण वर्गाकरिता

विद्यार्थ्यांना पुस्तके देण्याची व्यवस्था केलेली आहे. सन १९९५–९६ सत्रापासून महाविद्यालयाचे वर्ग संस्थेचा नवीन इमारतीत भरत आहेत. महाविद्यालयाची शैक्षणिक सोईंनी उपयुक्त अशा भव्य वास्तूची निर्मिती प्रगती पथावर आहे. महाविद्यालयाच्या भव्य प्रांगणात मुलामुलींची वसतीगृहे, कर्मचाऱ्यांकरिता निवासस्थाने, अद्यायावत प्रयोगशाळा, क्रीडांगणे व भव्य ग्रंथालयांची बांधणी करण्याचा संस्थेचा संकल्प असून अनेक संकल्प प्रत्यक्षात पूर्ण होत आहेत.

मा. स्व. श्री. भाऊसाहेब मुळक यांनी उमरेड निर्वाचन क्षेत्रातील जनतेचे महाराष्ट्र विधानसभेवर प्रतिनिधीत्व करुन शासनात मंत्रीपद भुषविले हे सर्वांना माहीतच आहे. बॅकवर्ड क्लास युथ रिलीफ कमेटीच्या माध्यमातून हया ग्रामीण भागातील जनतेचे ऋण फेडण्याच्या दृष्टीने खालील योजना आखलेल्या आहेत. भाऊसाहेबांनी योजलेल्या प्रकल्पांना पूर्णत्वास नेण्यास व संस्थेच्या विकासासाठी त्यांचे चिरंजीव मा. राजेंद्रजी मुळक उर्फ बाबासाहेब (माजी राज्यमंत्री) सातत्याने प्रयत्नात असतात. त्यांच्या तडफदार व कार्यप्रवण शैलीमुळेच संस्थांची दिवसेंदिवस भरभराट होत आहे हे लक्षात घ्यावेच लागते. संस्थेचे माननीय सचिव माजी मंत्री श्री. राजेंद्र मुळक साहेब यांनी संस्थेच्या शिक्षण वृक्षाला एक नवीन पालवी दिली. खेड्यातील तरुण हा स्वबळावर खंबीरणे उभा असला पाहिजे यासाठी माननीय माजी राज्य मंत्री राजेंद्र मुळक साहेब यांनी अथक परिश्रमातून महाविद्यालीयाच्या शैक्षणिक बाबींकडे लक्ष पुरविले व वेळोवेळी मार्गदर्शन व सहकार्य केले. त्यांच्या मार्गदर्शनातूनच भिवापूर महाविद्यालीयाचा 'निर्धार' पक्का झाला. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या अंगी असलेले साहित्यिक व कलागुण स्पष्ट व्हावे व विद्यार्थ्यांमध्ये लेखनाच्या संदर्भात नवा जोश निर्माण व्हावा म्हणून 'निर्धार' ची संकल्पना पुढे आली. वाचकांना हा महाविद्यालयीन 'निर्धार' प्रचंड आवडेल अशी अपेक्षा आहे.

* नॅक चे 'ब' श्रेणीत मुल्यांकन.
* ग्रामीण भागातील सुशिक्षित महिलांना रोजगाराची संधी उपलब्ध करुन देण्यासाठी यथायोग्य सहकार्य.
* ग्रामीण भागत महिला गृहउद्योग व शिवणकला शिकण्यासाठी आर्थिक सहाय्य देण्याची योजना.
* राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत विविध कार्यक्रम राबविल्या जात आहेत. या योजनेत सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना विद्यापीठ परीक्षेसाठी प्रोत्साहन गुण दिले जातात तसेच आंतर महाविद्यालयीन खेळ/ क्रीडा स्पर्धात भाग घेणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रोत्साहन गुण दिले जातात.

* महाविद्यालय परिसरात सामान्य जनतेच्या उपयोगासाठी भव्य सभागृह बांधण्याचा मानस आहे.
* भिवापूर महाविद्यालयात अर्थशास्त्र, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, इ. विषयांचे पदव्युत्तर अभ्यासक्रम (एम.ए) सुरु आहेत.
* भिवापूर महाविद्यालयात बी.लिब., एम.कॉम., एम.बी.ए., एम.एस.सी व विविध व्यावसायिक अभ्यासक्रम सुरु करण्याचा विचार आहे. शहरी विद्यार्थ्यांप्रमाणेच ग्रामीण विद्यार्थ्यांना सर्वांगिण विकासाचे शिक्षण उपलब्ध व्हावे म्हणून संस्था प्रयत्नांची पराकाष्ठा करीत आहे.
* आंतरराष्ट्रीय स्तराचा तरंग तलाव उपलब्ध आहे. आंतर महाविद्यालयीन स्पर्धेचे आयोजन करण्याचा संस्थेचा मानस आहे.
* भव्य जिम्नॅस्टिकची सोय उपलब्ध आहे.
* इनडोअर स्टेडीयम व भव्य क्रीडांगण उपलब्ध आहे.
* मुलींसाठी स्वतंत्र वसतीगृहाची सोय.
* महिला अध्ययन व सेवा केंद्र उपलब्ध आहे.
* एन.सी.सी. पथक कार्यरत आहे.
* मुलींकरीता नि:शुल्क ज्युडो कराटे प्रशिक्षण सुरु आहे.
* मुलींकरीता नि:शुल्क फॅशन डिझाइनिंग अभ्यासक्रम उपलब्ध आहे.
* स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र स्थापन करण्यात आलेले आहे.
* रोजगाराच्या संधीसाठी महाविद्यालयात मुलाखतीचे आयोजन केले जाते.
* संगणक व इंटरनेट प्रशिक्षणाची सुविधा उपलब्ध आहे.
* संस्थेतर्फे के.डी.के. इंटरनॅशनल स्कूलची प्रगतीकडे वाटचाल सूरु आहे .
* Bachelor of Vocational (B.Voc) या व्यावसायिक रोजगाराभिमुख पदवीचे अभ्यासक्रम सूरु आहे.

**डॉ. जोबी जॉर्ज**
**प्राचार्य,**
**भिवापूर महाविद्यालय, भिवापूर**

## संपादकीय

भिवापूर महाविद्यालय भिवापूर या ग्रामीण भागातील **'निर्धार'** हा वार्षिकांक वाचकांच्या हातात देतांना अतिशय आनंद होत आहे. या आधीच्या वार्षिकांकची प्रशंसा झाल्यामुळे हा वार्षिकांक फुलेल, बहरेल व फळास येईल यात शंका नाही. भिवापूर सारख्या ग्रामीण भागात असणारे महाविद्यालय व महाविद्यालयात शिक्षण घेणारे विद्यार्थी यांच्यात कल्पना, स्फूर्ती, प्रेरणा व प्रतिभेचे सहज सूंदर रुप या वार्षिकांकात सादर झाले आहे.

यशस्वीतेसाठी आमचे महाविद्यालयीन विश्वच प्रेरक ठरते. त्या दृष्टीने विद्यार्थ्यांमध्ये लेखन शैलीचा विकास होऊन समाजाप्रती असलेल्या ऋणानुबंधाची जाणीव या निमित्ताने करुन देण्याच्या दृष्टिकोणातून निर्धार या वार्षिकांकाची संधी आम्हाला मिळाली.

संस्थाचालक स्व. श्री. मा. भाऊसाहेब मुळक यांचे प्रात्साहन, संस्थेचे सचिव माजी मंत्री ना. राजेंद्रबाबु मुळक व महाविद्यालयाचे कर्तबगार प्राचार्य डॉ. जोबी जॉर्ज यांच्या प्रयत्नांनी पदवी (बी.एस. सी) विज्ञान शाखेची सोय तालुका स्तरावर या महाविद्यालयात झाली आहे. त्यामुळे कनिष्ठ शाखेपासून तर पदवीपर्यंत कला, वाणिज्य व विज्ञान शाखा व पदव्युत्तर (अर्थशास्त्र, राज्यशास्त्र व समाजशास्त्र) या शिक्षणाची सोय विद्यार्थ्यांना मिळाली आहे. संस्थेचे सचिव, माजी मंत्री मा. राजेंद्रबाबु मुळक यांनी ग्रामीण भागाशी जवळीक साधून समाजाची सेवा करण्याचा मार्ग पत्करला आहे. ऋण कधीच विसरता येत नाही.

महाविद्यालयाने या भागात अन्यत्र कोठेही नसलेला बी.होक. (फुड प्रोसेसिंग, बिल्डींग टेक्नालॉजी, सॉप्टवेअर डेव्हलपमेंट आणि हॉर्डवेअर डेव्हलपमेंट) या पदवी व्यावसायिक अभ्यासक्रमाची संधी विद्यार्थ्यांना प्राप्त झाल्यामुळे अनेक विद्यार्थी रोजगाराभिमुख व्यावसायिक अभ्यासक्रमाची पदवी घेत आहेत. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी कनिष्ठ शाखेपासून तर पदवीपर्यंत कला, वाणिज्य व विज्ञान शाखा व पदव्युत्तर शिक्षणाची सोय झाल्यामुळे या परिसरातील विद्यार्थ्यांना 'जो जे वांछिल तो ते लाहो' या संत ज्ञानेश्वरांच्या पसायदानातील उक्तीप्रमाणे वर्ग ११वी ते पदवी कला, वाणिज्य, विज्ञान, बी.होक व एम.ए. पर्यतच्या विद्यार्थ्यांनी शिक्षणाचा हवा तो मार्ग पत्करावा व या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा हे एक आव्हानच.

साहित्यिक व रसिकांच्या मधला दुवा साधून आम्ही 'निर्धार' रसिकार्पण करीत आहोत. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची साहित्य सृजन निर्धारच्या माध्यमातून साकर होतांना अंकातील सर्वच लेखनाशी आम्ही सहमत आहोत असे नाही. तसेच या वार्षिकांकात समाविष्ठ झालेले साहित्य ही विद्यार्थ्यांची स्वत:ची व संकलित केलेली लेखनकृती आहे असे गृहीत धरुन त्यांच्या साहित्याला स्थान दिले आहे. मागील अंकाप्रमाणे हा ही अंक सर्वांना आवडावा अशी अपेक्षा.
वार्षिकांकातर्फे सर्वांना शुभकामना!

| **संपादक** | **मुखपष्ठकार** | **मार्गदर्शक** |
|---|---|---|
| कु. अश्विनी दिघोरे (मराठी) | कु. समिक्षा सहारे | डॉ. मधुकर नंदनवार |
| कु. प्रियंका नारनवरे (इंग्रजी) | | प्रा. सोमेश्वर वासेकर |

(या अंकातील सर्वच लेखांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.)

# बॅकवर्डक्लास युथ रिलीफ कमिटी, नागपूर

र.नं. महा. १५२/७४ नागपूर

# कार्यकारी मंडळ

| | | |
|---|---|---|
| १. सौ. सुमनमाला भाऊसाहेब मुळक | - | अध्यक्षा |
| २. श्री. वामनराव गोविंदराव मुळक | - | उपाध्यक्ष |
| ३. श्री. राजेंद्र भाऊसाहेब मुळक | - | सचिव |
| ४. श्रीमती श्रीलेखा राजन लांजेकर | - | सहसचिव |
| ५. श्री. यशराज राजेंद्र मुळक | - | कोषाध्यक्ष |
| ६. श्री. दिलीप कृष्णरावमहाडीक | - | सदस्य |
| ७. श्रीमती पद्मजाताई श्याम दांडगे पाटील | - | सदस्या |

# भिवापूर महाविद्यालय

भिवापूर, जि. नागपूर

दूरध्वनी क्र. २३२३४९ ( एस. टी. डी. ०७१०६)

## महाविद्यालय विकास समिती- २०१९-२०

| | | |
|---|---|---|
| १. सौ. सुमनमाला भाऊसाहेब मुळक | - | अध्यक्षा |
| २. श्री. राजेंद्र भाऊसाहेब मुळक | - | सचिव |
| ३. डॉ. सुनिल कृष्णराव शिंदे | - | विभागप्रमुख |
| ४. डॉ. मोतीराज रामदास चव्हाण | - | प्राध्यापक प्रतिनिधी |
| ५. डॉ. अनिता विवेक महावादीवार | - | प्राध्यापक प्रतिनिधी |
| ६. प्रा. राजश्री ओ.पी. | - | प्राध्यापक प्रतिनिधी |
| ७. श्री. संजय चंद्रभान मेश्राम | - | अध्यापकेत्तर कर्मचारी |
| ८. श्री. पद्माकर के. अग्रवाल | - | स्थानिक सदस्य |
| ९. श्री. प्रभाकर चव्हाण | - | स्थानिक सदस्य |
| १०. श्री. दिलीप मोतीलाल गुप्ता | - | स्थानिक सदस्य |
| ११. श्री. सुधिर वावरे ( माजी विद्यार्थी) | - | स्थानिक सदस्य |
| १२. डॉ. मंगेश वसंतराव कडू | - | समन्वयक (नॅक) |
| १३. प्राचार्य डॉ. जोबी जॉर्ज | - | सदस्य सचिव तथा प्राचार्य |

# भिवापूर महाविद्यालय भिवापूर

## महाविद्यालय प्रतिनिधी मंडळ

| | | |
|---|---|---|
| १. प्राचार्य डॉ. जोबी जॉर्ज | - | अध्यक्ष |
| २. डॉ. सुनिल कृ. शिंदे | - | प्रभारी प्राध्यापक |
| ३. डॉ. अनिता महावादीवार | - | विद्यार्थी परिषद प्रभारी |
| ४. प्रा. सोमेश्वर वासेकर | - | सांस्कृतिक विभाग प्रतिनिधी |
| ५. डॉ. आदित्य सारवे | - | क्रीडा विभागप्रमुख |

## वार्षिकांक समिती

| | | |
|---|---|---|
| १. प्राचार्य डॉ. जोबी जॉर्ज | - | अध्यक्ष |
| २. डॉ. मधुकर वि. नंदनवार | - | समिती सचिव |
| ३. प्रा. सोमेश्वर वासेकर | - | सदस्य |
| ४. प्रा. ज्योती बान्ते | - | सदस्य |

# भिवापूर महाविद्यालय भिवापूर

## प्राध्यापक वृंद (वरिष्ठ विभाग) कला

| | |
|---|---|
| १. डॉ. जोबी जॉर्ज | प्राचार्य (इंग्रजी) |
| २. डॉ. सुनिल कृ. शिंदे | सहयोगी प्राध्यापक ( अर्थशास्त्र) |
| ३. डॉ. मंगेश व. कडू | सहाय्यक प्राध्यापक ( राज्यशास्त्र) |
| ४. डॉ. मोतीराजरा रा. चव्हाण | सहाय्यक प्राध्यापक (इतिहास) |
| ५. डॉ. मधुकर वि. नंदनवार | सहयोगी प्राध्यापक (मराठी) |
| ६. डॉ. विजय शं. दिघोरे | सहाय्यक प्राध्यापक (समाजशास्त्र) |
| ७. डॉ. राहिल कुरैशी | सहाय्यक प्राध्यापक (इंग्रजी) |
| ८. प्रा. सोमेश्वर वासेकर | सहाय्यक प्राध्यापक (इंग्रजी) |
| ९. डॉ. आदित्य सारवे | सहाय्यक प्राध्यापक (शारीरिक शिक्षण) |
| १०.प्रा. राजश्री ओ. पी. | सहाय्यक प्राध्यापिका (ग्रंथालय) |
| ११.डॉ. विनिता विरगंधम | सहाय्यक प्राध्यापिका (इंग्रजी) |

## प्राध्यापक वृंद (वरिष्ठ विभाग) वाणिज्य

| | |
|---|---|
| १.डॉ. अनिता वि. महावादिवार | सहाय्यक प्राध्यापिका (वाणिज्य) |
| २.डॉ.राजेश सं. बहुरुपी | सहाय्यक प्राध्यापक (वाणिज्य) |

## प्राध्यापक वृंद (वरिष्ठ विभाग) विज्ञान

| | |
|---|---|
| १.डॉ. सारंग धोटे | सहाय्यक प्राध्यापिका (रसायनशास्त्र) |
| २.डॉ. नितीशा पाटणकर | सहाय्यक प्राध्यापक (प्राणीशास्त्र) |
| ३.प्रा. अमित काळबांधे | सहाय्यक प्राध्यापिका (रसायनशास्त्र) |
| ४.डॉ. योगेश मोरे | सहाय्यक प्राध्यापक (भौतिकशास्त्र) |

## प्राध्यापक वृंद (कनिष्ठ विभाग)

| | |
|---|---|
| १. प्रा. उषा ना. चुन्हे | (मराठी, समाजशास्त्र) |
| २. डॉ. वैशाली प्र. रहाटे | (इंग्रजी, अर्थशास्त्र) |
| ३. प्रा. सागर यादव | (विज्ञान) |
| ४. प्रा. ज्योती बान्ते | (मराठी) |
| ५. प्रा. चेतना ठाकरे | (वाणिज्य) |

## शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद

| | | |
|---|---|---|
| १. श्री. संजय चं. मेश्राम | — | कनिष्ठ लिपीक |
| २. श्री. अमोल वि. भगत | — | कनिष्ठ लिपीक |
| ३. श्री. शंकर को. फेंडर | — | शिपाई |
| ४. श्री. गुलाब र. गेडेकर | — | ग्रंथालय परिचर |
| ५. श्री. रत्नाकर रा. कन्नाके | — | शिपाई |
| ६. श्रीमती सविता म. झोडापे | — | शिपाई |
| ७. कु. हर्षलता बोडे | — | प्रयोगशाळा सहाय्यक |
| ८. श्री. गणेश शहाणे | — | प्रयोगशाळा परिचर |
| ९. कु. जीजा पराते | — | प्रयोगशाळा परिचर |
| १०.श्री. खुशवंत दमके | — | प्रयोगशाळा परिचर |
| ११.श्री. सागर शंकर फेंडर | — | प्रयोगशाळा परिचर |
| १२.श्रीमती दिपीका पारवे | — | प्रयोगशाळा सहाय्यक |

# प्रेम

प्रेम ही अशी अनूभूती आहे
जी सर्वांना हवीशी वाटते
जीच्या समोर सर्वस्व
नकोस वाटते.
प्रेम आहे तरी काय
प्रेम म्हणजे सोबत असते
तर कोणाला प्रेम म्हणजे
जगण्याची ताकद असते.
प्रेम म्हणजे काय सांगावं
मनाच मनाशी समर्पण असते.
मग कितीही दुरावा असू देत
जगण्याची हिम्मत हे प्रेम असते.
परंतु अलिकडे बदललय हो सर्व
क्षणिक आकर्षण करतोय मती भ्रष्ठ
ज्याला प्रेम समजून केल्या जातात
माता भगिनी नष्ठ.
ती स्त्री नाही हो फक्त भोगवस्तू
ती आहे मातृत्व, ती आहे दातृत्व
ती आहे प्रेमाचा पाझर
सृष्टीला जन्म देणारी मायेचा सागर

**कु.नेहा रमेश सावरकर**
**बी.ए. ३ अंत्य**

# मन

तु वार करत रहा
मी वार झेलत राहील
रडून डोळे थकतील तेव्हा
मनानंच दगडं होईल
दगड वार झेलु शकेल
धार बोथट करु शकेल
थकुन जेव्हा आधार शोधशील
दगड उशीही बनु शकेल

**कु. वैष्णवी आनंदराव ढोणे**
**बी.ए. व्दितीय**

# खचले आज जरी मी.....

खचले आज जरी मी
तरी थांबणार नाही
स्वप्न उदयाचे साकार करण्यास
पंखास बळ भारी।
स्वप्नांच्या या वाटेवरती
मिळाल्या दृष्य–अदृष्य साथी
बळकटी दिली या मनाला
पेटविण्या ध्येयाच्या मशाली।
ध्येयाची ही मशाल
आता विझणार नाही
खचले आज जरी मी
तरी थांबणार नाही।

**कु.नेहा रमेश सावरकर**
**बी.ए. ३ अंत्य**

# संघर्ष

जीवनाच्या या प्रवासात,
दु:ख तर भरपूर आहे
पण आपले ध्येय उराशी घेवून चला
सुखही अपार आहे
या अनमोल जीवनाला
देऊ अशी संघर्षाची चाहूल
आपल्या जगण्याला असावा अर्थ
असे टाका तुम्ही आपले पाऊल
यशाचा शिखर गाठताना
संकट आले तरी पण चालेल
खडतर वाट असली तरी
मनात बाळगु नका भीती
मनातला खरा आत्मविश्वास
हेच आपले ध्येय आहे
आत्मविश्वासाने सत्याच्या
मार्गावर चाला, आणि ध्यैयाने
आपले यश संपादन करा.
गाठाल जेव्हा यशाचा शिखर
तेच आपले शौर्य आहे

**कु. अश्विनी फतरु दिघोरे**
**बी.ए. अंत्य**

# मैत्री

मैत्री ही नाजुक असं बंधन असतं,
मैत्रीमध्ये अमीरी–गरीबी हा प्रश्नच नसतं,
फक्त आणि फक्त मित्रांचा विश्वास हवा असतं,
मात्र कितीही दूर गेले,
तरी ते मात्र हृदयाच्या कोपर्यापर्यंत असतात,
मैत्री ही नाजुक धाग्याप्रमाणेच असते,
पण हा मैत्रीचा धागा तुटू न देणें,
मित्रांच्या हाती असते.
त्यासाठी प्रेमळ व विश्वासू मित्रांची
साथ हवी असते.

**कु. तप्ती अरुण खोब्रागडे**
**बी.ए. व्दितीय**

# जन्म

सुख पाहिजे असेल
तर रात्री जागू नका.....
शांती पाहिजे असेल
तर दुपारी झोपू नका....
सन्मान पाहिजे असेल
तर व्यर्थ बोलू नका....
आणि आयुष्य आनंदात
जगायंच असेल तर
आपले तोडू नका.....
कारण...........
हा जन्म पुन्हा नाही......

**कु. अश्विनी रा. तिवाडे**
**बी.ए. व्दितीय**

## नातं बहिण भावाचं

थोडं खोडकर थोडं भांडखोर
पण एकमेकांशिवाय एक सेकंद ही नाही राहवत
ते सुंदर नात म्हणजे बहिण भावाचे
आईला त्याची चुगली पण तीच करते
आई रागवायला लागली तर
नाही करणार आई तो पुन्हा सांगणारी तिच असते
ते सुदंर नातं म्हणजे बहिण भावाचे
आई नंतर, भावाची दुसरी आई सुध्दा तिच असते.
त्याची पहिली मैत्रीण पण तिच असते.
थोडी हिटलर, प्रेमळ, काळजी करणारी
ते सुंदर नातं म्हणजे बहिण भावाचे
गोड बोलून तिचे काम करुन घेणारी तीच असते.
नाही ऐकल्यावर मग मी सांगुण देईल आईला
कुना कुनाचे कॉल येते,
थोड हिटलर निखळ नातं हे बहिण भावाचेच
असते
थोडे दिवस राहते सोबती त्याचा
उडून जाते, पाखरा सारखी भूर्रकन केव्हाच
करमेना अजीबात त्याला तिच्याविना
घर झाले शांत त्याच्या मस्तीविना
आठवण येते त्याला प्रत्येक क्षणाला
आईला विचारतो ताई येईल केव्हा.

**अंकिता डी. भोयर**
**बी.ए. व्दितीय**

## नातं

आयुष्यात असं एक नातं असावं
आयुष्यात असं एक नातं असाव
दिसण्यावर नाही मनावर प्रेम करणारं
जगाला दाखविण्यासाठी नाही
आपल्या दोघात जग निर्माण करणारं
आयुष्यात असं एक नातं असावं
कितीही भांडण झाली तरी साथ न सोडणारं
आपली मनापासून विचारपूस करणारं
आपली काळजी करणारं
आयुष्यात असं एक नातं असावं
एक उदास असतांना दुसऱ्याने ते न सांगताच
ओळखणारं.....
डोळयात न दिसणार पाणी
मनातल्या नजरेन अलगद टिपणारं
आयुष्यात असं एक तरी नात असावं

**अंकिता डी. भोयर**
**बी.ए. व्दितीय**

# निसर्ग

निसर्ग रंगात रंगुया
सरगम सुर हे आपण छेडूया
निसर्ग रंगात आपण सारे रंगुया
पाऊल वाटेच्या दुतर्फा झाडांची हि दाटी
मन जाई हा मोहुनी निसर्गाने
तन–मन होई प्रसन्न रे प्रसन्न..
खळ–खळ वाटे हा झरा
छेत चाहूला या निसर्गाची
मतीचा हा सुगंध दरवळे चहुकडे
निसर्गाची या किमयाच न्यारी
सरगम सुर हे आपण छेडूया
निसर्ग रंगात आपण सारे रंगुया......

**पंकज रा. तिडके**
**बी.ए. तृतिय**

# एक मित्र आहे माझा

एक वेडा मित्र आहे माझा
नेहमीच करत राहतो दुसऱ्यांची काळजी
थोडासा आहे नटखट
थोडासा आहे खडूसही
प्रेमळ ही आहे खूप
जसं की पावसातलं पाणी
जेव्हा निघते घराच्या बाहेर
निघताच लोक सांगतात काम
तो नाही कधीच म्हणत
ऐकत असतो नेहमीच काम
देवा त्याला नेहमीच
सुखात ठेवशील ना
जन्मोजन्मी त्याला माझाच
मित्र म्हणून पाठवशील ना
ऐवढेच मनने आहे माझे.

**प्रताप मधुकरराव ठवकर**
**बी.ए. भाग १**

# शब्द

बोलताना जरा सांभाळून
शब्दाला तलावाप्रमाणे धार असते
फरक फक्त येवढाच की,
तलवारीने मान तर
शब्दांनी माण कापले जाते.
जरी तलवारीच्या जखमेने
आणि शब्दाच्या जखमेतून
अश्रू येत असले तरी....

**प्रतिक्षा किशोर चांभारे**
**बी.ए. व्दितीय**

# माणूस

लिहीताना मला शब्द सुचत नाही
तरी पण हात माझे लिहूनच पाही
लिहीता लिहीता काय लिहून गेलो
माझया समोरील सुदंर सृष्टी विसरुनी गेलो
सृष्टी मध्ये रंग आहे अनेक
पण त्या सृष्टीचे रंग उधळी
माणुस मात्र एक, माणुस मात्र एक

**प्रणित ठाकरे**
**बी.ए. तृतिय**

## लेक लाडकी

माझी माय म्हणे
लेक आहे माझी गुणी
साऱ्या संसाराची गोडी
घर जग सांभाळते ।। धृ।।

घरा दाराला सुखी ठेवून
आपण सुखी राहते
ज्गा वर तिच प्रेम
तशी ती आहे लाडकी ।। १ ।।

आई–बाबा वरी प्रेम
भावा– बहीणीवरी प्रेम
ती करी सर्वांवर प्रेम
ती करी माय– बाबांचा आदर ।। २।।

भावा– बहीणीस सांभाळी
माय– बापास सांभाळी
त्यांना त्रास नाही होऊ देई
त्यांच्या वर लय प्रेम करी ।। ३।।

तु आहेस गुणी गं
मामा– मामीस सुख देई
त्यांच्या वर प्रेम करी
तु सर्वांची गं लाडकी ।। ४।।

माझी माय म्हणे
तु साऱ्या जणांना आवडे गं
तु माझी लेक आहे गुणी
साऱ्या जगाला प्रेम देई ।। ५।।

**शामली अरुणजी नागोसे**
**बी.ए. तृतिय**

## स्त्री जन्म घेऊन बघ

एकदा तरी स्त्री जन्म घेऊन बघ
स्त्रियांचे थोड आयुष्य जगून बघ
बालपणी कुठ सरु होत स्वतंत्र जगनं
बघता बघता बदलत जात स्त्रिच जिवन
वयात येताच लोकांच्या वाईट नजरा फिरु लागतात
चारही बाजुंनी अत्याचाराचे वारे घोंगावतात
स्त्रियांसारख थोड वागुण बघ
एकदातरी स्त्री जन्म घेऊन बघ,

श्रीमंत स्थळासाठी लग्नाची होते घाई
स्त्रीचा विचार कोणी समजून ना घेई
मुहूर्त ठरतात सर्व काही बोलणी होतात
हुंडयाचे फास माहेरला बसतात
स्त्री बनून सासरी जावून तर बघ
एकदातरी स्त्री जन्म घेऊन बघ

नशीबात फक्त चूल आणि मूल बघण्याचा
आई होणार म्हणून कधी आनंद होतो
वंशाला दिवा हवा असे जो तो बोलतो
या जीवघेण्या प्रवासाची वाट चालून बघ
एकदातरी स्त्री जन्म घेऊन बघ

**अंकिता डी. भोयर**
**बी.ए. व्दितीय**

# अधूराडाव

आडोश्याला उभी तू
चाहूल माझी लागते
धडधडते अंत:करण
मन मोहरुन हसते
घर तुझे रस्त्यावर
मन येता जाता डोकावते
घुम घुम तुझ्या पैजणांची
हृदयाच्या गाभाऱ्यात साठवते
नजर नजरेशी बोले
किती गेले उन्हाळे, पावसाळे.......
आस ही मीलनाची
नजर नजरेत घुटमळे
मोडला गं! डाव अर्ध्यावरी
पौर्णीमे नंतर अमावस्या लागते
नाही गं! माझी तू आता
मांडीवर तुझ्या छकूलं खेळते

**संकेत खाबांळकर**
**बी. कॉम. व्द्तिीय**

# स्वच्छता

स्वच्छता नेहमी नाराज होती.
सगळेजन तिला बेकारीत सोडती
न मिळे सुटका त्यापासूनी
आरोळयाच, आरोळया सतत फोडती.
न ऐकल्याचे सगळे नाटक करती
असुदध करण्यास तयार होती
सगळेच त्यास हातभार देती
न विचार कोणाचा कधीच करती
म्हणता येई आपणा,
सगळीच दुनिया त्यातच मोडती
बेकारी त्यांच्या चिकटुनी जव
स्वच्छतेला मिळणे कठिण आहे स्वातंत्र्य
स्वच्छता स्वच्छता ओरडूनी जव
शेवटी मरणे तिच्या नशिबात
कोणापुढे हात पसरवावे आपण
असा तिचा असे नेहमीचा प्रश्न

**संकेत संजयराव साबळे**
**बी.ए. तृतिय**

## यश

तलवार तळपाविशी,
जिंकावयास नेण्याशी
धरीला जो निश्चयी,
तो सार्थकी लावण्याशी ।। १ ।।

अगाध शक्ती एकटवी
होई ती महाशक्ती
उघडूनी येई बाहुतुनी
संकटाला लढण्याशी ।। २ ।।

करीया तव प्रयत्न
होई ते परीपूर्ण
धरीला जो ध्यास
नेयी यश ओलांडण्यास ।। ३ ।।

**संकेत खाबांळकर**
**बी. कॉम. व्दितीय**

## माय

मायेचा स्पर्श
ओठांचा गंध
सुर्याचा किरण
रक्तातील रस
ते असे मायेत
माझी माय, माझी माय ।। १ ।।
कष्टांचा कळस
सामर्ध्य बाहुत
आधार मुलात
जगते दुसऱ्यात
ते असे मायेत
माझी माय..... माझी माय।।२।।
झटते पोटास,
उठते कामास
निजते कष्टास
लढते संकटास
ते असे मायेत
माझी माय..... माझी माय.।।३।।

**संकेत संजयराव साबळे**
**बी.ए. तृतिय**

# स्त्री

स्त्री म्हणजे ममतेचा सागरच नसते तर ती मायेचा सागर आहे. स्त्री आपल्या मुलांसाठी रात्र रात्र उपाशी राहून आपल्या मुलांना काबाड कष्ट करुन आपल्या घासातला घास देणारी ही एक स्त्रीच असते. पण त्या स्त्री चा धिक्कार का? ज्या स्त्रीच्या उदरातून ज्या पुरुषांनी जन्म घेतला ती एक स्त्रीच आहे. मग या स्त्रीला अपमानीत का पुरुषानी करावं. जो पुरुष या समाजात वास्तव करत आहे. तो त्याच स्त्रीच्या उदरातुन जन्मलेला आहे. जी स्त्री ९ महिने आपल्या पोटात संघर्ष करीत आपल्या बाळाला वाढते तेव्हा ती याचा विचार करीत नाही की माझ्या उदरात वाढत असणारा बाळ एक मुलगा आहे किंवा मुलगी तीला दोन्ही समान असतात. ती दोघांनाही समान वागणूक देते. जो पुरुष एका स्त्रीच्या उदरातून जन्मलेला असुन तो एका मुलीची आस न करता एका मुलाची करतो. पण तो हे समजत नाही की आपण एका स्त्रीचाच मुलगा आहे. आपल्याला सुध्दा एका स्त्रीने जन्म दिले आहे जर असीच स्त्री भ्रुण हत्या झाली तर स्त्रीची संख्या कशी वाढेल आणि पुरुषांचा वंश कसा वाढेल ज्यावेळी स्त्री अस्तित्वात राहील त्यावेळाच पुरुषाचा जन्म होईल त्यासाठी स्त्री असणे आवश्यक आहे. मग पुरुषांनी एका मुलाची आशा सोडून मुलगी हवी अशी विचारसरणी ठेवावी.

**सपना म. ठवकर**
**बी. कॉम. व्दितीय**

# कोरोना : समज—गैरसमज

एका कुटुंबात सर्व लोक एकत्र राहत होते. त्यातील एकाचा रिपोर्ट कोरोना पॉझिटीव्ह आलाय याचा अर्थ असा की, कोरोना हा फक्त Weak Immunity (कमी रोगप्रतिकार शक्ती) असणा—याला त्रास देतो. बहुतेक करुन लोकांना हा होऊन गेलेला कळतही नाही. किंवा झालेला असतांनाही कसलीच लक्षणे आढळत नाही. यातून एकच लक्षात येते की सकारात्मक दृष्टिकोन (Positive Approach) ठेवून स्वत:ची काळजी घेऊन दैनंदिन कामे करत राहिलात तर तुम्हाला काही होणार नाही.

सगळ्यात आधी News Channel पाहणे सोडून दया. आपल्या सगळयांच्या डोक्यात कोरोनाची भिती एवढी बसली आहे की, घसा खवखवायला लागला तरी आपल्याला वाटतं कोरोनाच झालाय आणि याच भितीमुळे लोक जास्त मरत आहे. समजा जर आपल्याला कोरोना झाला तर आपल्याला हे माहित असायला हवं की हा आजार बरा होऊ शकतो. कोरोना झालेल्या पेशंटला दाखवण्यात ही फक्त ताप उतरवायच्या गोळया, तासातासाने गरम पाणी आणि Immunity वाढवायच्या गोळया दिल्या जातात. फक्त १० टक्के लोकांनाच ऑक्सिजनची गरज असते. ते ही त्यांना जर काही व्याधी असतील किंवा वय जास्त असेल तरच फक्त ३० टक्के लोक

व्हेंटिलेटरवर असतात. त्यामुळे भवि यात तुम्हाला जरी कोरोना झाला तरी न घाबरता त्याला सामोरे जा.

मलेरिया आणि डेंग्युसारखाच हा आजार आहे. फरक एवढाच आहे की, कोरोना झाला म्हणजे सगळया समाजमाध्यमांनी त्याची भिती एवढी वाढवली की कोरोना झाला म्हणजे सगळच संपलं असाच लोकांना वाटायला लागलं. वास्तविक कारणामुळे आपल्याला हे कळले की, जगात इतरांपेक्षा आपल्यामध्ये रोगप्रतिकार शक्ती नक्कीच जास्त आहे. काळजी घ्या पण सारखा सारखा कोरोनाचाच जप करु नका आणखी एक सांगायच म्हणजे माणुसकी विसरु नका, कोरोना झाला म्हणून त्याला एकट सोडू नका त्याला कोरोना विरुध्द लढण्याची हिम्मत दया. कोरोना आज ना उदया जाईल पण तुमची वागणुक मरेपर्यंत लक्षात राहील.

**अंकिता भोयर**
**बी.ए. व्दितीय**

# जीवनातील क्षण

जीवनातील क्षण हे जपूण ठेवायचे असतात. तर काही क्षण हे मनावर कोरुन ठेवायचे असतात. जीवनातील क्षण हे पाण्यासारखे असतात. आता येथे तर मग तेथे क्षण हे मन भंगुर असतात. जीवनातील क्षण हे कुणाचसाठी थांबत नाही. ते घडयाळाच्या तासीके प्रमाणे समोर समोर चालतच जात असतात. त्यांच्या मध्ये कुणीच येऊ शकत नाही. काही क्षणाची आपण आठवण म्हणून आपल्या जवळ ठेवतो. जर आपण दु:खी असतो किंवा सुखी असतो. तेव्हा त्या क्षणाची आठवण आपल्याला येते. आपल मन त्या आठवणी कडे खेचल्या जाते. त्या क्षणाला आपण मनात कोरुन ठेवायचा प्रयत्न करतो. ते क्षण आपल्यासाठी चांगले किंवा वाईट असतील ते आपण आपल्या मध्ये सामावून घेतो. असे हे जिवनातील काही क्षण आहे ते आपल्याला सर्वांना जपून ठेवायचे आहे.

जीवनातील आपण मोठ झाल्यावर आपण सर्वांत आधी करतो 'मैत्री' मैत्री हा शब्द असा आहे की, तो सर्वांनाच आवडतो फक्त मैत्रीसाठी ''काही आठवणी विसरता येत नाही, काही नाही तोडता येत नाही''

''मैत्री ही समुद्राच्या पाण्याप्रमाणे विशाल असते. त्या मध्ये कितेक मित्र, मैत्रीणी समावून घेण्याची शक्ती असते''

''मैत्रीला कधी गंध नसतो मैत्रीचा फक्त छंद असतो. मैत्री सर्वांनी करावी त्यातच खरा आनंद असतो.''

आनंद आपण शोधतच असतो तो आपल्या जवळून चालला जातो तरी तो आपल्याला कळत नाही. म्हणूनच जिवणातील क्षण हे कोरुन ठेवायचे असतात तर काही क्षण साठवून ठेवायचे असतात.

# आई म्हणजे आई असते

आई म्हणायला किती सोपं वाटतं, पण 'आई' या शब्दाचा किती मोठा अर्थ होतो. 'आ' म्हणजे 'आत्मा' आणि 'ई' म्हणजे 'ईश्वर' म्हणजे ईश्वर रूपी एक देवच नं. आई म्हणजे काय असते हे आई झाल्यावर कळत की आईची माया काय असते? आणि आई, आपल्या मुलाबाळांसाठी किती तिची माया लावते. आई आपल्या मुलांसाठी किती कष्ट करते. ती सकाळी उठल्यापासून तर संध्याकाळपर्यंत तिच्या कामात व्यस्त होवून जाते. शेतात जाणारी आई असो, घरकाम करणारी आई असो, की नोकरीवर जाणारी आई असो ती सकाळी उठल्यापासुन झोपेपर्यंत ती कष्टच करत असते. ती स्वत:साठी नव्हे तर आपल्या मुलांसाठी, कुटुंबासाठी कष्ट करीत असते. तिला अस वाटतं की, मेहनत करून आपण पैसे कमवू. ते पैसे आपल्या मुलांसाठी कामात येईल. असे तिला वाटत असते. आपल्या मुलांचे आयुष्य आनंदात जावं. आपल्या सारखे राबत रहायला नको, कष्ट करायला नको असं तिला वाटतं. आपल्या मुलांनी चांगल शिकावं, खुप मांठं व्हावं अशी तिची इच्छा असते.

देवानं आपल्याला किती सुंदर आयुष्य दिलं आहे. या सुंदर आयुष्यात चांगल्या आईची साथ दिली आहे. कितीही मोठी व्यक्ती असो किंवा गरीब व्यक्ती असो त्याला आईची माया ही सारखीच असते. आणि तेवढचं जिव्हाळ्यानं प्रेम करणारी आई ही सारखीच आहे. आई आपला बाळ गर्भात असल्यापासून त्याच्यावर प्रेम करायला सुरूवात करते तर मरेपर्यंत. नऊ महिने ती आपल्या बाळाला गर्भात पाळत असते नऊ महिन्यांपर्यंत गर्भाशयात असलेल्या बाळाची काळजी घेत असते. आई आपल्याला लहानपणपासून किती चांगले संस्कार देत असते. सर्वांनाच उपयोगी पडणारे संस्कार हे आईच देत असते. कोणाशी कस बोलावं, कसं आदर भावानं वागावं, म्हाताऱ्या व्यक्तीशी कसं प्रेमाने बोलावं, आपले वर्तन चांगले ठेवावे, अशा प्रकारचे अनेक चांगले संस्कार आईच देत असते. आईची माया ही वेगळीच असते. तिची ही माया अपार आहे. ती मनापासुन जिव्हाळ्यानं सर्वांवर प्रेम करीत असते. पण ती काही चुकले तरचं आपल्या मुलांवर रागवते, नंतर त्याला त्याची चुकही समजवून सांगते. ती नि:स्वार्थपणे आपल्या मुलांवर प्रेम करीत असते.

